N.C.R.B (ए.सी.आर

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई  **P.S.(ठाणे):** कळंबोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0195  **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/09/2022 03:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 20/09/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 20/09/2022

**Time From (वेळेपासून):** 18:36 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:36 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/09/2022  **Time (वेळ):** 02:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/09/2022 03:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कार्यालयाचे केबिनमध्ये कळंबोली,महामार्ग पोलीस केंद्र,पनवेल , पनवेल विभाग,नवी मुंबई, ता-पनवेल जि-रायगड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** पंकज विजय चव्हाण

**(b)Father's Name (वडील चे नाव) :** विजय चव्हाण

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं2504,बिल्डींग नं8 जी,1,इंडिया बुल्स ग्रीन,कोनगांव ,पनवेल, जिरायगड,कळंबोली ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं2504,बिल्डींग नं8जी1,इंडिया बुल्स ग्रीन,कोनगांव ,पनवेल, जिरायगड,नवीन पनवेल,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208012636

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामचंद्र नारायण वारे | | वडील का नाम : नारायण वारे | 1. 303 बानो मेन्शन से-19, कोपरखैरणे नवी मुंबई , कळंबोली ,नवी मुंबई,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | एकूण 1,00,000/ रूपये रक्कम | 100,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

100,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी श्री.पंकज विजय चव्हाण,वय-40वर्षे,धंदा-नोकरी,पोलीस उप निरीक्षक,नेमणुक पळस्पे महामार्ग पोलीस केंद्र, नवी मुंबई रा.प्लॅट नं. 2504, बिल्डींग नं. 8 जी 1, इंडिया बुल्स ग्रीन, कोनगांव पनवेल, जि.रायगड मो.क्र. 8208012636 असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी वरिल पत्यावर माझे परीवारासह राहत असून सन 2021 पासून पळस्पे महामार्ग पोलीस केंद्र येथे पोलीस उप निरीक्षक पदावर कार्यरत आहे.पळस्पे येथील अधिकारी व अंमलदार यांची विशेष मोहीम कारवाईसाठी खालापूर टोल नाका येथे डयुटी लावण्यात येते. सदरची डयुटी ही माझे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.रामचंद्र वारे यांचे कार्यालयातून लावण्यात येते.खालापूर टोल नाका येथे सहायक पोलीस निरीक्षक श्री.फाटक हे डयुटीस आहेत. या व्यतिरीक्त मी व माझ्या सोबतचे पोलीस उप निरीक्षक श्री.केसरकर असे आळीपाळीने खालापूर टोल नाका येथे डयुटीवर असतो.सदरच्या दोन्ही ठिकाणी कर्तव्यासाठी ये-जा करणे सुसंगत होत नसल्याने मी माझे वरीष्ठ अधिकारी पोलीस निरीक्षक श्री.रामचंद्र वारे यांना कोणत्याही एका ठिकाणी कायमस्वरूपी नेमणुक देण्याची विनंती केली. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री.वारे यांनी माझेकडे माझे व माझे सोबतचे पोलीस उप निरीक्षक श्री.केसरकर यांची कोणत्याही एका ठिकाणी कायमस्वरूपी नेमणुक देणेकरिता दोघांकडू ून प्रत्येकी 50,000/-रू. असे एकुण 1,00,000/- रू.लाचेची मागणी केली. सेच श्री.केसरकर यांचेकडून मी पैसे घेवून दयावे याकरीता ही माझेकडे तगादा लावला आहे.परंतू मला लोकसेवक पोलीस निरीक्षक श्री.रामचंद्र वारे यांना माझे बदलीकरीता लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही व श्री.केसरकर यांचेकडूनही पैसे घेवून पोलीस निरीक्षक श्री.वारे यांना दयायची ईच्छा नसल्याने मी दिनांक 15/09/2022 रोजी मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांची भेट घेवून माझी तक्रार तोंडी सांगीतली होती.सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सा ो. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांनी मला माझे तक्रारीवर पुढील कारवाई श्री.जगताप,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर हे करणार असून ते माझेशी संपर्क करतील असे सांगितले.

त्याप्रमाणे दिनांक 15/09/2022 रोजी श्री.जगताप यांनी मला फोनद्वारे संपर्क केला त्यावेळी मी त्यांना माझी तक्रार सांगितली.त्यावेळी मी श्री.जगताप यांना दिनांक-16/09/2022 रोजी खालापुर, जि.रायगड येथील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग टोल नाका येथे पोलीस निरीक्षक श्री.वारे हे भेटणार असल्याचे सांगितले. त्यावेळी श्री.जगताप यांनी दिनांक-16/09/2022 रोजी सदर ठिकाणी तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करण्याचे ठरविले.

दिनांक-16/09/2022 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांना खालापुर, जि.रायगड येथील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग टोल नाक्याजवळ भेटलो.त्यावेळी त्यांनी त्याच्यासोबत असलेल्या पंच व पडताळणी पथकाची ओळख करून देवून माझी लेखी तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून घेतली.

माझे सदर तक्रारीचे अनुषंगाने लोकसे असे आळीपाळीने महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे व खालापूर टोल नाका येथे डयुटीवर असतो.सदरच्या दोन्ही ठिकाणी कर्तव्यासाठी ये-जा करणे सुसंगत होत नसल्याने आम्हा दोघांना महामार्ग पोलीस केंद्रावर कोणत्याही एका ठिकाणी कायमस्वरूपी नेमणुक देण्यासाठी यातील आरोपीत लोकसेवक श्री.रामचंद्र नारायण वारे,वय 57 वर्षे, पोलीस निरीक्षक,नेम. महामार्ग पोलीस केंद्र, पनवेल विभाग,नवी मुंबई यांनी माझे व पोउपनिरी/श्री.केसरकर यांचे मिळून प्रत्येकी रू.50,000/- प्रमाणे एकुण 1,00,000/- रूपयांची लाचेची रक्कमेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.20/09/2022 रोजी 18 ः36 वाजताचे सुमारास त्यांचे महामार्ग पोलीस केंद्र,पनवेल वक श्री.रामचंद्र वारे, पोलीस निरीक्षक हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पंचासमक्ष दिनांक-16/09/2022 रोजी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले.त्यावेळी मी पोलीस उप अधीक्षक

श्री.जगताप यांना लोकसेवक श्री.रामचंद्र वारे हे मला भेटण्यासाठी खालापूर टोल नाका येथील महामार्ग पोलीस चौकीत येणार असल्याचे सं◌ागितले.त्यावेळी त्यांनी मला माझी सदर ठिकाणीच डयुटी करण्याच्या सुचना दिल्या व ज्यावेळी लोकसेवक येणार असल्याची माहीती मिळेल त्यावेळी पडताळणी करणार असल्याचे सांगून सर्व पडताळणी पथक थांबून राहिले.काही वेळाने लोकसेवक श्री.रामचंद्र वारे हे माझे◌े डयुटीच्या ठिकाणी येणार असल्याची मला माहिती मिळाली तसे त्याबाबत मी पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांना सांगितले त्यावेळी त्यांनी कायदेशिर कारवाई पुर्ण करून लोकसेवक यांची येण्याची वाट पाहू लागलो.परंतू लोकसेवक रामचंद्र वारे हे सदर ठिकाणी आले नाहीत.त्यामुळे त्यांची भेट झाली नाही त्यामुळे लाचेच्या मागणीची पडताळणी झाली नाही.त्यानंतर दिनांक-17/09/2022 व दिनांक 18/09/2022 रोजी माझी सुटी असल्याने मी लोकसेवक हे माझेशी जसा संपर्क करतील त्याप्रमाणे मी पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांना कळवेन असे सांगून मी माझे कर्तव्यावरून घरी निघून गेलो.

त्यानंतर लोकसेवक रामचंद्र वारे यांनी मला दिनांक-17/09/2022 रोजी फोनद्वारे संपर्क करून त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम घेण्यासाठी दिनांक 19/09/2022 रोजी खालापुर,जि.रायगड येथील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग टोल नाका येथे दुपारच्या वेळेत येणार असल्याचे मला सांगितले.याबाबत मी लागलीच पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांना कळविले.त्याप्रमाणे श्री.जगताप हे पडताळणी पथकासह दिनांक-19/09/2022 रोजी खालापुर, जि.रायगड येथील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग टोल नाक्याजवळ भेटले व लोकसेवक हे मला भेटण्यास येण्याची वाट पाहू लागले.लोकसेवक मला भेटण्यासाठी आमचे पोलीस चौकीमध्ये येण्याची माहिती मिळताच पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांना माहिती दिली.

त्यावेळी त्यांनी कायदेशिर बाबीची पुर्तता करून पुन्हा माझे डयुटीचे ठिकाणी खालापूर टोल नाका येथील महामार्ग पोलीस चौकी येथे आलो त्यावेळी लोकसेवक श्री.रामचंद्र वारे हे चौकीमध्ये बसून पोहवा/श्री.भास्कर खाडे यांचेशी बोलत होते. त्यावेळी मी थोडा वेळ लोकसेवक श्री.वारे यांचेशि सुट्टीबाबत गप्पा मारल्यानंतर पोहवा/भास्कर खाडे यांना सदर केबिनच्या बाहेर थांबण्यास सांगितले.त्याप्रमाणे ते बाहेर गेले.त्यावेळी मी लोकसेवक श्री.वारे यांना माझे कामाचे अनुशंगाने पोलीस उप निरीक्षक श्री.केसरकर यांचा फोन आला का असे सांगून कामाचे अनुशंगाने बोलणी केली.त्यावर लोकसेवक वारे यांनी फोन केलेला नसून तुम्हाला काही सांगून ठेवलंय का असे बोलले त्यावर मी श्री. वारे यांना बदलीचे जर रेडी असेल तर तो रेडी आहे◌े असे बोललो.त्यावेळी श्री.वारे यांनी श्री.केसरकर यांना पैसे दे म्हणावं.. त्यांना दयायला काय प्रा◌ॅब्लेम आहे?. तुम्ही करा ना मग असे बोलले. त्यावेळी मी त्यांना ''काही कमी होईल का बघा असे सांगून मागच्या वेळेस तुम्हाला एक दिले होते. त्याच्या नंतर पंचवीस लागलेत.पोउपनिरी श्री. केसरकर यांना शंका होती'' असे बोललो असता लोकसेवक श्री.वारे हे ''नाही जास्त होईल उलट...कमी कशाच'' ''पंचवीस हजारात काय नाय होणार बाबा'' ''दया ना पैसे'' असे बोलले. तेव्हा मी पोउपनिरी श्री.केसरकर हे माझे अकाउंटला पैसे टाकणार आहेत असे सांगितले.तसेच मी लोकसेवक श्री.वारे यांना ''दोघाचे मिळून साठ सत्तर हजारात होत असेल तर नाहीतर दोघ मिळून एक लाख देवू ही गोष्ट तुमच्याशी पोउपनिरी श्री.केसरकर यांना तुमच्याशी बोलायची होती'' असे सांगितले असता लोकसेवक श्री.वारे यांनी मला पोउपनिरी श्री.केसरकर यांना व्हा◌ॅईस का◌ॅल करायला सांगितला. त्याप्रमाणे मी श्री.केसरकर यांना फोन करून श्री.केसरकर यांची लोकसेवक श्री.वारे यांचेशी बोलणी करून दिली.त्यावेळी लोकसेवक श्री.वारे हे पोउपनिरी श्री.केसरकर यांना ''टू झिरो.... दोनावर पाच शुन्य'' असे बोलले. त्यानंतर मी पोउनि/श्री.केसरकर यांना लोकसेवक वारे यांना प्रत्येकी पन्नास-पन्नास हजार रूपये याप्रमाणे दोघांचे मिळून एकूण एक लाख रूपये दयायचे आहेत असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. वारे हे ''आ◌ॅर्डर शंभर टक्के होईल असे बोलले''

त्यानंतर लोकसेवक श्री.वारे यांनी मला दोघं◌ाचेही देवून टाका असे सांगितले.त्यावेळी मी त्यांना सोबत देवू का असे विचारले असता ते 'हा' असे सांगून ''आज देवून टाकायचे.....दया तिथ काय आहे...सगळच दयाव लागत सगळ...अस काय करता तुम्ही'' असे बोलले व उदया पैसे दया असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री.वारे यांनी खालापूर टोल नाका येथे डयूटी लावण्याचा मासिक हप्त्यांचे अनुशंगाने मला ''ते जमा केले का तुम्ही.....मला विस तारखेच्या आधी दयावे◌े लागतात. मागचेच बाकी आहेत.हे तर जमा करून टाका ना...आजच काय करता आजचे जमा करून टाका ना'' हे पहिले मला ते वीस तारखे पर्यंत दयावे लागतात'' असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे हे करतो.उदया संध्याकाळी देतो बाकी असे सांगितले.नंतर मी पडताळणी पथकाचे शासकिय वाहनात येवून पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांना श्री वारे हे उदया दिनांक 20/09/2022 रोजी लाचेची रक्कम घेणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर पोउपअधी/श्री.जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे मी आज दिनांक 20/09/2022 रोजी सापळा कारवाई दरम्यान खालापूर टोल नाका येथे सापळा पथकाच्या शासकिय वाहनामध्ये सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण

करून प्रथम लोकसेवक यांना फोनकरून लाचेच्या रक्कमेची व्यवस्था झालेली असल्याबाबत सांगितले असता लोकसेवक श्री.वारे यांनी दुपारच्या जेवणानंतर लाचेची रक्कम कोणत्या ठिकाणी घेवून यायचे आहे ते सांगतो असे बोलले.त्यानंतर सायंकाळी लोकसेवक श्री.वारे यांनी मला लाचेची रक्कम त्यांचे कार्यालयात घेवून येण्यास सांगितले त्याप्रमाणे माझे अंगावर डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर लावून तसेच अॅंथ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या 1,00,000/- रूपये रक्कमेसह पंच नं.01 यांचेसोबत लोकसेवक श्री.वारे यांच्या पनवेल महामार्ग पोलीस केंद्र,नवी मुंबई येथील कार्यालयात जावून भेटलो असता त्यांचेशी थोडा वेळ गप्पा मारून नंतर माझेकडील लाचेची रक्कम 1,00,000/-रूपये काढून त्यांचेसमोर धरली असता त्यांनी सदरची रक्कम स्विकारून टेबलच्या ड्राॅव्हरमध्ये ठेवून दिली. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक श्री.रामचंद्र वारे यांना त्यांचे कार्यालयातील केबिनमध्ये आज दि. 20/09/2022 रोजी 18ः36 वाजताचे सुमारास रंगेहात पकडले.तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर कार्यालयाकडून दिनांक 19/09/2022 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान मी व माझ्या सोबतचे पोलीस उप निरीक्षक श्री.केसरकर असे आळीपाळीने महामार्ग पोलीस केंद्र पळस्पे व खालापूर टोल नाका येथे डयुटीवर असतो.सदरच्या दोन्ही ठिकाणी कर्तव्यासाठी ये-जा करणे सुसंगत होत नसल्याने आम्हा दोघांना महामार्ग पोलीस केंद्रावर कोणत्याही एका ठिकाणी कायमस्वरूपी नेमणुक देण्यासाठी यातील आरोपीत लोकसेवक श्री.रामचंद्र नारायण वारे,वय 57 वर्षे, पोलीस निरीक्षक,नेम. महामार्ग पोलीस केंद्र, पनवेल विभाग,नवी मुंबई यांनी माझे व पोउपनिरी/श्री.केसरकर यांचे मिळून प्रत्येकी रू.50,000/- प्रमाणे एकूण 1,00,000/- रूपयांची लाचेची रक्कमेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.20/09/2022 रोजी 18ः36 वाजताचे सुमारास त्यांचे महामार्ग पोलीस केंद्र,पनवेल विभाग,नवी मुंबई कार्यालयाचे केबिनमध्ये माझेकडून स्विकारली म्हणून माझी नमूद आरोपीत लोकसेवक यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Sushant Keshav Dudde
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPSKDM9004
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Bhalavi PSI P.V. Chalvi

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sanjay Gangadhar P
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

Gadde
पोलीस ठाणे अंमलदार
कळंबोली पोलीस स्टेशन
नवी मुंबई

N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**